# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.९२ /२५ /त.क्र.६२ /२६/०१**

श्री.चंद्रकांत महेश्वरी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) एच/पश्चिम विभाग,
बृ.मुं.म.पा. एम/प. विभाग कार्यालय, शरदभाऊ आचार्य मार्ग,
नटराज सिनेमा जवळ, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी (इ. व का.) एच/पश्चिम विभाग,
बृ.मुं.म.पा. एम/प. विभाग कार्यालय, शरदभाऊ आचार्य मार्ग,
नटराज सिनेमा जवळ, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १०.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.महेश्वरी यांनी अपील क्रमांक ५९३६/२४ दि.२७/१२/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अंशतः अनुपालन झाले असले तरी, प्रत्यक्षात कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यावर **कलम १८** अन्वये तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता इमारत व कारखाने श्रीमती प्रियांका वावळे यांच्या वतीने कुठलाही खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

ही बाब लक्षात घेता उपरोक्त आदेशाचे अनुपालन झाले असल्यास अनुपालन अहवाल तसेच अपिलार्थीना मुद्देनिहाय सविस्तर माहिती देण्याच्या आदेशाचे तंतोतंत पालन करीत दिलेल्या माहितीचा एक संच अपिलार्थीना पुन:श्च एकदा प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

ठिकाण : मुंबई
दिनांक : १०.०३.२०२६